
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5. 7631(UIF)

# आदिवासी समाजाच्या विकासात शाश्वत संस्था, मंचरचे योगदान

डॉ.जाधव संतोष हनुमंत
एम.ए.एम.फिल.नेट.सेट.पीएच्.डी. (इतिहास)
अण्णासाहेब आवटे कॉलेज,मंचर..

**प्रस्तावना:**



आंबेगाव तालुका हा मागासलेला होता. विशेषत: पश्चिम भागात आदिवासी समाजाचे प्रमाण जास्त होते व आहे. त्या समाजाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती दयनीय होती. 'आदिम संस्कृती जपणारा पारंपारीक जीवन जगणारा समाज म्हणजे आदिवासी समाज' हा समाज साक्षर नव्हता तरीही निसर्गाशी एकरूप झाला होता. २० व्या शतकाच्या पुर्वार्धापर्यंत आदिवासी समाजाला आधुनिक युगाची पूसटशीही कल्पना नव्हती. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात त्यांच्या विकासासाठी काही सिध्दांत मांडले होते. शासकीय पातळीवर आदिवासी विकासासाठी प्रयत्न केले जात होते. त्याप्रमाणे स्वयंसेवी संस्थाही कार्यरत होत्या व आहेत.

आंबेगाव तालुक्यातील आदिवासींसाठी एका दाम्पत्याने आयुष्य वाहून घेतले. ते दाम्पत्य म्हणजे कुसूमताई कर्णिक व आनंद कपूर आणि त्यांनी स्थापन केलेली शाश्वत संस्था, मंचर. यांनी आदिवासी समाजाचा शाश्वत विकास करण्यावर लक्ष केंद्रीत केले. त्या कामासाठी त्याच समाजातील माणसं उभी केली.

## कुसूमताई कर्णिक व आनंद कपूर यांचा परिचय :

१९८१ पासून आजपर्यंत गेली ३० – ३५ वर्षे कुसूमताई कर्णिक व आनंद कपूर अहोरात्र आदिवासी बांधवांसाठी काम करतात. कुसूमताईचा जन्म मुंबईत झाला. त्यांनी मानसशास्त्र विषयातून बी.ए. ची पदवी संपादन केली. एम.ए. पुण्यामध्ये केले दरम्यान नर्सिंगचा कोर्सही केला. त्यांच्या या कोर्समुळेच पुढे समाजसेवेचा हा मार्ग मिळाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर १४ वर्षे शिक्षिका म्हणून काम केले. त्यांना लहानपणापासूनच राष्ट्रसेवादलाचे बाळकडू मिळालं होतं. त्यांच्यावर कम्युनिस्ट विचारसरणीचा आणि साने गुरूजी, जयप्रकाश नारायण इत्यादी व्यक्तींचा प्रभाव होता. त्या १९७५ पासून सामाजिक कार्याकडे वळाल्या. त्यासाठी त्यांनी ठाणे येथे प्रशिक्षण घेतले. महाराष्ट्र आरोग्य मंडळाकडे काम करू लागल्या. पुढे १९८१ पासून त्या आंबेगाव तालुक्याच्या परिसरात असणाऱ्या आदिवासी समाजासाठी काम करत आहेत.[१]

आनंद कपूर मुळचे राजस्थानचे आहेत. त्यांनी अभियांत्रिकीची पदवी खरगपूर येथील आय.आय.टी. अभियांत्रिकी महाविद्यालयातून संपादीत केली. त्यांची मिलीटरीमध्ये टेक्नीकल विभागात निवड झाली होती, तसेच टाटा मोटर्समध्येही त्यांना नोकरीची संधी मिळाली होती. मात्र त्यांनी सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे या चंगल्या पगाराच्या नोकऱ्या नाकारल्या. महाराष्ट्र आरोग्य मंडळाकडे काम करण्यास सुरूवात केली.[२] या दाम्पत्याला सामाजिक सेवेसाठी महाराष्ट्र आरोग्य मंडळाकडे काम करत असताना



Scanned with OKEN Scanner

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम भागात दोन वर्षे वास्तव्य करावे लागले. त्यावेळी त्यांना आदिवासी समाजाचे जीवन व समस्या जवळून पहाता आले अनुभवता आले. त्यामधूनच या समाजासाठी काम करण्याचा वसाच या दाम्पत्याने घेतला.

**कार्याचा प्रारंभ व शाश्वतची स्थापना :**

महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे काम करताना आदिवासी समाजाशी जवळचा संबंध आला. या आदिवासी समाजात महादेव कोळी, ठाकर, कातकरी व भिल्ल या आदिवासी जमाती राहतात. त्यामधील काही गावांमध्ये संपूर्ण महादेव कोळी समाजाची लोकसंख्या वास्तव्य करते. उदा. तेरूंगण, माळीण, असाणे इत्यादी. या भागातील लोकांचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती आहे. याव्यतिरिक्त जनावरे पाळणे, जंगलातील वनौपजे – लाकूड, गवत, पाने, मध, डिंक, फळे, हिरडा, बेहडा गोळा करून विकणे. इ. छोटी – मोठी कामे आदिवासी करतात.[३]

शेती मुख्य व्यवसाय असला तरी बहुतांश आदिवासींच्या जमीनी सावकार, जैन, पारसी अशा लोकांकडे कर्जासाठी गहाण ठेवाव्या लागल्या व ते स्वत: शेतमजूर बनले. पुर्व – परंपरागत बी – बियाणे खते वापरल्यामुळे शेतीमधून मिळणारं उत्पन्न कमी मिळत होते. त्यामुळे त्यांच्यासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होत होता. जिथे उदरनिर्वाहच भागविता येत नाही अशा समाजात कुपोषण, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्त्रीयांचे प्रश्न, पोटाची अडचण झाली की सावकराकडून कर्ज घ्यायचे. अशा समस्यांच्या ओझ्याखाली आदिवासी समाज दबुन गेला होता. डोंगरी भाग असल्यामुळे पावसाळ्यात भाताचे पिक घेतले जायचे. त्यानंतर पाण्याची कमतरता असल्यामुळे घरातील लोक कामासाठी कोकणात स्थलांतर करायचे. आठ महिने ते बाहेर काम करत व गावाकडे पैसें पाठवायचे मात्र तरीही दरम्यान मुलांची उपासमार व्हायची. आदिवासी समाजातील शेतकरी स्त्रीया व मुले यांचे आहार, आरोग्य, शिक्षण यासारखे मुलभूत प्रश्न कुसूमताई कर्णिक व आनंद कपूर यांना स्वस्थ बसू देत नव्हते. त्यावर उपाय शोधण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले.

महाराष्ट्र आरोग्य मंडळाकडे काम करताना आदिवासी लोकांना विश्वासात घेण्याचे कार्य चालू होते. लोकांना या नवीन पोषाखात आलेल्या या अधिकाऱ्यांची भिती वाटायची ते जवळ येत नसत. 'ताईंनी आदिवासींचा विश्वास संपादन करण्यासाठी रात्री आदिवासी कुटुंबाकडे मुक्कामी राहयच्या त्या कुटुंबाकडे खाण्यासाठी काही नसेल तर भाताबरोबर मीठ खाऊन राहिल्या.' आदिवासींबरोबर जवळीक साधण्यासाठी मुलं हे साधन योग्य आहे, असे लक्षात आल्यानंतर बालवाडीच्या माध्यमातून आपल्या कार्याचा प्रारंभ केला.' असे कुसूमताई कर्णिक सांगतात.[४]

शाश्वत संस्थेची स्थापना १९९६ साली केली. त्यानंतर संस्थेने आपल्या कार्याला व्यापक रूप दिले. डिंभे धरणाच्या निर्मितीमुळे धरणक्षेत्रात येणाच्या गावातील लोकांना आपल्या जमीनी गमवाव्या लागल्या होत्या. काही गावांचे पूनर्वसन झाले. अंशत: बाधित गावातील लोक आपला परिसर सोडून गेले नाहीत. साहजिकच त्यांचा परिसरातील इतर व्यवस्थेवर बोजा पडला. या सर्व अडचणींवर तोडगा काढण्याचा प्रयत्न शाश्वतने केला. त्यांनी आपल्या कार्याची सुरूवात मुलांच्या शिक्षणापासून केली. डिंभे धरणात ज्या लोकांच्या जमीनी गेल्या अशा लोकांना धरणावर आधारीत मत्स्य व्यवसाय, शेतीसाठी जलसिंचन, स्त्रीयांच्या आरोग्यात सुधारणा, शेतीच्या मालकी हक्कासंबंधी जागृती, घरे बांधून देण्याची योजना, समाजातील संस्कृतीचे संवर्धन व्हावे म्हणून स्त्री – पुरूष यांच्यासाठी वेगवेगळे उपक्रम साजरे केले जातात. शाश्वत संस्था आंबेगाव तालुक्यातील आदिवासी समाज विकासाचे साधनच बनली. वरील सर्व योजना शासकीय आर्थिक मदत, अनेक खाजगी कंपन्यांची मदत व वैयक्तिक देणगीदारांच्या मदतीने राबविल्या जात आहेत.

**आदिवासींच्या उध्दारासाठी शिक्षण :**

म. फुलेंनी शिक्षण हे समाजविकासाचे मुख्य साधन आहे असे ठामपणे सांगितले. समाजातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या स्त्रीया व अस्पृश्यांना शिक्षण मिळावे म्हणून क्रांतीकारी पाऊल टाकले. त्यामुळे सर्वसामान्यांना शिक्षणाचे दरवाजे खुले झाले.[५] आदिवासी समाज हा शिक्षणापासून दूर असल्यामुळेच तो अडाणी राहिला व परंपरेने जीवन जगत आहे. कोणत्याही समाजाला आधुनिक युगाच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर शिक्षणाची आवश्यकता असते. शिक्षण नसेल तर आर्थिक व सामाजिक सुधारणेसाठी केलेले प्रयत्न विशेष बदल घडवू शकत नाहीत. ज्या समाजाची सुधारणा करावयाची त्या समाजाला जोपर्यंत केल्या जाणाऱ्या सुधारणेचे महत्त्व पटत नाही, तोपर्यंत त्या सुधारणा बाहेरून लादल्यासारख्या होतात व अल्पजीवी ठरतात. म्हणूनच त्या लोकांना शिक्षण देणे गरजेचे असते. भारतात हे कार्य प्रथम मिशनरी लोकांनी सुरू केले. मिशनऱ्यांच्या सेवाकार्यात शिक्षणप्रसार व रूग्णसुश्रुषा या गोष्टींवर प्रामुख्याने भर होता. चर्च ऑफ दि ब्रेदेन मिशन या अमेरिकन मिशनरीतर्फे मल्याण या गावच्या बाजारात रेव्हरंड ॲडॅम एबी या गृहस्थाने १९०३ साली वारली आदिवासी जमातीकरता एक दवाखाना सुरू केला. त्यांनी लोकांचा विश्वास संपादन केल्यानंतर १९२३ साली पालघर येथे ग्रामीण वसतिशाळा काढली. ते ठाणे, नाशिक आणि धुळे जिल्ह्यात दुष्काळग्रस्तांना मदत, ग्रामीण भागात शाळा चालवीत आजारी रूग्णांवर औषधोपचार करत. या सेवांमुळे आदिवासींची मने जिंकली. मात्र या सर्व कामामागे त्यांचा स्वार्थी हेतू होता. कारण ते त्याबरोबरच धर्मप्रसाराचे कार्यही करत होते.

मिशनऱ्यांच्या कार्यामुळे त्यांच्या सेवेचे अनुकरण म्हणून म्हणा किंवा आपल्या बांधवाविषयी कर्तव्याची जाणीव झाली म्हणून सेवा वृत्तीने कार्य करणाऱ्या काही संस्था स्थापन होऊ लागल्या. १९०५ साली नामदार गोखले यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली. भारतातील ज्या थोर व्यक्तींनी या संस्थेचे सदस्यत्व स्वीकारले व संस्थेमार्फत आमरण सेवाकार्य केले. त्यापैकी ठक्करबापा हे एक होते. त्यांनी १९२२ साली गुजरातमधील 'दोहद' येथे आदिवासींची सेवा करण्यासाठी भिल्ल सेवा मंडळ सुरू केले. त्यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रभर अनेक संस्था स्थापन झाल्या. त्यांनी आदिवासी जमातीसाठी प्राथमिक शाळा, वसतिगृहे, आश्रमशाळा काढून मोठ्या प्रमाणावर शिक्षणप्रसाराचे कार्य केले.[६]

सरकारी पातळीवरही काही प्रयत्न करण्यात आले. भारत सरकारने खेड्यांमधून शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी १९५३ – ५४ मध्ये आश्रमशाळेची योजना सुरू केली. आश्रमशाळा म्हणजे निवासाची सोय असलेली प्राथमिक व माध्यमिक शाळा. १९५४ मध्ये आचार्य भिसे यांच्या सूचनेनुसार ठाणे, धुळे, नाशिक, जळगाव या जिल्ह्यात चार आश्रमशाळा काढण्यात आल्या. या शाळा स्वयंस्फूर्त संस्थांकडून चालविल्या जात. त्यासाठी त्यांना सरकारमान्य बाबींवर ९० टक्के अनुदान देण्यात येई. आदिवासी विकास महामंडळाने आदिवासी भागात आश्रमशाळा काढण्याचा भरीव आणि व्यापक स्वरूपाचा कार्यक्रम हाती घेतला. या मंडळाचे आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय घोडेगाव येथे आहे.[७] येथून जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील आदिवासींसाठी कार्य केले जाते. शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या आदिवासी आश्रमशाळांची व विद्यार्थ्यांची संख्या.

**आदिवासी शाळा व विद्यार्थ्यांची संख्या**
**पहिले ते बारावी ( सन २००० – २००१)[८]**

| जिल्हा | प्रकल्प | शासकीय आदिवासी शाळांची संख्या | आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या. | स्वयंसेवी संस्थांच्या आदिवासी शाळांची संख्या | आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या. | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | आ. शा. संख्या | आ.वि. संख्या |
| पुणे | घोडेगाव | २० | ५२०५ | ९ | २९४२ | २९ | ८१४७ |



Scanned with OKEN Scanner

आंबेगाव तालुक्यात आदिवासी समाजासाठी शासकीय योजनांच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. त्याचप्रमाणे स्वयंसेवी संस्थाही काम करत आहेत.

शाश्वत संस्था त्यापैकीच एक आहे. या संस्थेमार्फत प्राथमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २००१ पासून 'वनदेव विद्या मंदिर बोर्डींग' आधाने या खेड्यात चालविले जाते.[९] या बोर्डींगमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना जेवण, गणवेश, पाठ्यपुस्तकं, अंथरूण पांघरूण व औषधांची व्यवस्था केलेली आहे. त्यासाठी आवश्यक असणारा निधी 'टेक महिंद्रा फाऊंडेशन' या संस्थेकडून पुरविला जातो. आदिवासी मुलांना शिक्षण मिळाव म्हणून शाश्वत सतत प्रयत्नशील आहे. आज शाश्वततर्फे एकूण ९ बालवाडीचे वर्ग चालविले जातात. विशेष म्हणजे बालवाडी चालविण्याचे काम आदिवासी महिला करत आहेत. त्यासाठी त्यांना प्रशिक्षण दिले जाते. या कार्यामुळे समाजजागृती होण्यासाठी मोठा हातभार लागतोय. हे बालवाडीचे वर्ग वेगवेगळ्या खेड्यातून चालविले जातात. त्यामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १०५ आहे.[१०] या विद्यार्थ्यांना शिक्षणात गोडी निर्माण व्हावी म्हणून त्यांना भात दिला जातो. तसेच गाण्यांच्या साहाय्याने नृत्य शिकविले जाते. येथेच त्यांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा होतो. येथील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी संस्थेच्या आधाने येथील बोर्डींगमध्ये किंवा शासकीय आश्रमशाळेत प्रवेशित करण्याचे काम संस्था करते. 'वनदेव विद्या मंदिर बोर्डींग' मध्ये शिक्षण घेणारी मुलं महादेव कोळी, कातकरी व ठाकर समाजाची आहेत. त्यांच्या भाषेत थोडासा बदल आहे तो जाणून घेऊन त्यांच्यात संवाद निर्माण करण्याचे काम केले जाते. शेजारच्या खेड्यातील मुलं स्पर्धेत सहभागी होतात. त्याचप्रमाणे हस्तकलांचे प्रदर्शन भरविले जाते. या स्पर्धेनंतर बक्षीसांचं वाटप केलं जातं. परिणामी शिक्षणापासून दूर असणाऱ्या मुलांनाही प्रवाहात आणण्यासाठी याचा फायदा होतो.[११]

प्राथमिक विभागात असणाऱ्या विद्यार्थ्यांना पावसाळ्यात भातलावणी कशी केली जाते हे दाखविण्यासाठी शेतीकडे नेले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्यात जिज्ञासा निर्माण होते. तेथे असणारी वेगवेगळी रोपे व फुलांच्या बाबत त्यांच्या मनात कुतूहल निर्माण होते. त्यांच्या या कुतूहलाची उकल व्हावी म्हणून २०१२ मध्ये राजेंद्र व डेबू यांच्या मदतीने 'कलर्स डे' साजरा केला. मुलांनी या उपक्रमात स्वयंस्फूर्तपणे सहभागी होऊन पेपरवर व भिंतीवर विविध चित्रे काढली. प्राथमिक शिक्षण पुर्ण झाल्यानंतर डिंभे येथे असणाऱ्या शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थी प्रवेश घेतात. २००१ मध्येवनदेव विद्या मंदिरात दोन विद्यार्थी होते. ते २०१२ मध्ये बारावी पास झाले.[१२] हे या शाळेचं व संस्थेच यश होतं.

**शेतकऱ्यांसाठी कार्य :**

आदिवासी जमातींचे उपजिवीकेचे मुख्य साधन शेती आहे. स्वत:ची शेती असणारे, दुसऱ्याची शेती खंडाने किंवा वाट्याने करणे तसेच दुसऱ्याच्या शेतीवर मजूरी करणारे असे तीन प्रकारात त्यांचे वर्गीकरण करता येईल. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील जमीन मुख्यत: डोंगराळ असून चढउताराची आहे. या विभागात पावसाळ्यात ५० इंचापासून २०० इंचापर्यंत पाऊस पडतो. पावसाळ्यात नद्या –नाल्यांना पूर येतात. मात्र उन्हाळ्यात नद्या कोरड्या पडतात. पावसाळ्यात अतिपावसामुळे या भागातील दळणवळण जवळजवळ थांबलेले असते. वहातुकीची गैरसोय, कच्चे पायवाटा, चढउताराचे रस्ते यामुळे उन्हाळ्यातदेखील प्रवास करणे कठीण असते. पावसाळ्यात भाताचे पिक घेतात. काही ठिकाणी हिवाळ्यातही पिक घेतात. गावचे क्षेत्र किंवा शिवार मोठे असूनही जंगलव्याप्त जमीन व नापीक कुरणांची जमीन जास्त आहे, तर लागवडीखालील जमीनीचे प्रमाण कमी आहे. हे पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव, जून्नर आणि खेड व अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील आदिवासी खेड्यांच्या पाहणीत माहिती उपलब्ध झाली. ही पाहणी एकुण दहा गावात झाली. आंबेगाव तालुक्यातील चार गावे – असाणे, गोहेखुर्द, माळीण, राजेवाडी या गावांची पाहणी करण्यात आली होती. त्यामध्ये शेतास अयोग्य क्षेत्र ६० टक्के लागवडीलायक जमीनीचे क्षेत्र केवळ ४० टक्के असल्याचे आढळले होते.[१३]

अशी परिस्थिती आदिवासींच्या वाट्याला आलेली. या भागात राहणारा आदिवासी शेतकरी कमी जमीन धारणक्षेत्र व त्यातून मिळणरं तोकड उत्पन्न यामुळे सतत दारिद्र्यात होता. त्यातच भर म्हणजे डिंभे धरणक्षेत्रात या भागातील आदिवासी शेतकऱ्यांची लागवडीयोग्य जमीन गेली होती. शाश्वत संस्थेने अशा



Scanned with OKEN Scanner

शेतकऱ्यांना धरणक्षेत्रात गेलेल्या जमीनीचा वापर करून घेता येऊ शकतो हे लक्षात आले. त्यावेळी संस्थेने शासकीय परवाना घेऊन जवळजवळ ४०० हेक्टर जमीन शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली. या जमीनीला 'गाळपेर' जमीन म्हणून ओळखले जाते. ही मिळालेली जमीन पिकविण्यासाठी पंप व पाईप मिळत नव्हते. सिंचन विभागाकडून डिंभे धरणातून पाणी मिळविण्यासाठी परवाना घेतला, त्यासाठी आवश्यक कर भरून कायदेशीर परवानगी मिळविली. रितसर परवाना मिळाल्यानंतर शेतकऱ्यांनी पंचायत समिती व आदिवासी विकास विभागाकडे अर्ज करून पंप व पाईप मिळविले. ते आपल्या कामात यशस्वी झाले. या कामात शाश्वतने शासन व आदिवासी यांच्यात मध्यस्थाची भूमिका बजावली. शिवाय इतर १३ शेतकऱ्यांना 'ग्रेव्हेज कॉटन लिमिटेड' व संस्थेच्या फंडातून तीन पंपसेट व पाईप दिले. त्यामुळे जवळजवळ २०० हेक्टर जमीन लागवडीखाली आली आहे. या जमीनीतून बाजरी, गहू, बटाटा, मेथी व इतर पालेभाजी पिकविली जाते. त्यामुळे आदिवासी शेतकऱ्याला दिलासा मिळतो आहे. शाश्वत संस्था शासनाच्या योजनांचा लाभ आदिवासींना मिळवून देतेच, शिवाय खाजगी संस्था व देणगीदारांकडूनही या लोकांना साहाय्य मिळवून देण्याचे कार्य करते. तसेच शैक्षणिक संस्थांच्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिपचे कार्यक्रमही आयोजित करते. २००८ मध्ये आय.आय.टी. मुंबई येथील एम.टेक. चे विद्यार्थी १० आठवडे इंटर्नशिपसाठी आले होते. त्यातील दोन विद्यार्थ्यांनी पाटण खेड्याच्या बाजूने पाणी आणण्यासाठी एक आराखडा तयार केला. त्यानुसार शाश्वतने शेतकऱ्यांना २०,००० रू. चे सहकार्य करून तो चॅनल तयार करून घेतला. त्या माध्यमातून त्या शेती क्षेत्राला पाणी मिळाले. २००९ मध्ये त्या पाण्याखलील शेतीत १० क्विंटल गहू पिकविला.[१४]

आदिवासी समाजात शेती करताना 'पडकई' पध्दत म्हणजे ज्याप्रमाणे आपल्याकडे सुगीच्या दिवसात एकमेकांना शेती कामासाठी मदत केली जाते. त्याला 'इर्जिक' असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे पडकई पध्दत आदिवासी लोक शेतीकामासाठी वापरतात. अशा कामात ताई स्वत: लोकांबरोबर काम करत. कारण ताई व आनंद कपूर यांना लोकांचा कामातील सहभाग वाढवायचा होता. काही वेळा आदिवासी कुटुंबात खाण्यासाठी काहीच शिल्लक नसायचं त्यावेळी ते लोक 'उपडीपासली' करायचे. 'उपडीपासली म्हणजे पोटभर पाणी पिऊन पोटावर झोपणे' असे ताई सांगतात.[१५] इतकी बिकट परिस्थिती या समाजाच्या वाट्याला होती. उन्हाळ्यात या लोकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून विहीरी खोदल्या, शासकीय योजनांच्या माध्यमातून पाण्याच्या टाक्या बांधल्या. त्यामुळे या लोकांची पाण्याची समस्या कमी होण्यास मदत झाली.

**मत्स्य व्यवसाय व्यवस्थापन :**

आदिवासी समाजाचा मुख्य व्यवसाय शेती व जंगलातील औषधी वनस्पती गोळा करणे हा होता. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर आधारीत ते आपला व्यवसाय चालवत. मात्र डिंभे धरणामुळे काही गावे विस्थापित झाली. शासनाकडून या गावांचे पूनर्वसन करण्यात आले. तथापि काही पूर्णत: बाधित गावातील व अंशत: बाधित गावातील काही लोकांनी त्या परिसरातच राहणे पसंत केले. त्यावेळी त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा डिंभे जलाशयासी संबंधीत मत्स्य व्यवसाय विकसीत करण्याचे काम शाश्वतने हाती घेतले असे आनंद कपूर सांगतात.[१६] डिंभे धरण क्षेत्रात जमीनी गेलेल्या लोकांनी 'श्रमिक आदिवासी मच्छीमारी सोसायटी' स्थापन केली. ह्या सोसायटीमार्फत डिंभे जलाशयात मत्स्य बीज सोडून वाढविले जाते. या मत्स्य बीजामध्ये रोहू, कटला व मरळ या प्रजाती सोडल्या जातात. व नंतर मासेमारी केली जाते. या व्यवसायात २०३ आदिवासी कुटुंबे सहभागी आहेत. मासेमारीसाठी या कुटुंबांनी १३८ बोटी बांधल्या व आवश्यक जाळ्यांची निर्मिती केली. या व्यवसायाने आदिवासी कुटुंबांना दिलासा मिळाला. तरीही मान्सूनमध्ये या व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या ठाकर व कातकरी कुटुंबांची काही प्रमाणात अडचण होते. त्यांची अडचण दूर व्हावी म्हणून केंद्रीय मत्स्य व्यवसाय शिक्षण संस्था, यांच्या मार्गदर्शनाखाली देखाव्यासाठी असणारे रंगीत मासे तयार करणे. जे ॲक्वारियममध्ये ठेवले जातात. त्याचप्रमाणे पिंजरा निर्मितीचे प्रशिक्षण दिले. According to Dr- Dilip Kumar, Director of the Cetral Institute of Fiisheries Education (CIFE), Mumbai, "For the first time ever, Our scientific expertise in

fish culture has been successfully applied by a Community of people in their own waters, to steer towards a sustainable livelihood"

या प्रशिक्षणामुळे आदिवासी लोकांना शाश्वत असे उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध झाले.[१७] २०१३ मध्ये आदिवासी मासेमारी सोसायटीने २७,५०० किलो मासेमारी केली. त्यापासून १९,९४,००० रूपये एवढे उत्पन्न मिळविले, तसेच 'नॅशनल फिशरीज डेव्हलपमेंट बोर्ड (एन.एफ.डी.बी.)' व

'द रूरल टेक्नॉलॉजी ॲक्शन ग्रुप ऑफ आय.आय.टी. बॉम्बे' आणि शाश्वत संस्थेच्या सहकार्याने वेगवेगळ्या ७२ तरंगत्या पिंजऱ्यांची निर्मिती केली.[१८] मासेमारी व्यवसाय व त्याच्याशी संबंधीत कामामुळे आदिवासी समाजातील लोकांना रोजगार मिळाला व त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटण्यास मदत झाली.

घरबांधणीसाठी मदत :

शाश्वत संस्थेने आदिवासी समाजाच्या जुन्या पध्दतीच्या घरांच्या जागी नवीन घरे बांधून मिळावीत म्हणून शासनाकडे प्रस्ताव पाठविला. विशेषत: कातकरी व ठाकर समाजाच्या कुटुंबांचा त्यामध्ये समावेश होता. कातकरी समाजाच्या १६ आणिठाकर समाजाच्या चार कुटुंबाच्या घराच्या बांधकामासाठी प्रत्येकी एक लाख रूपये मंजूर झाले. पैसे मंजूर झाले परंतु घराचा आराखडा व उपलब्ध पैशाचा योग्य वापर होण गरजेच होत. म्हणूनवास्तूविशारद अविनाश हवाल यांच्याशी चर्चा करून ४३ स्क्वेअर फूटांचे घरांचे आराखडे बनवून देण्यात आले. त्यानुसार घरांची बांधकामे झाली. लोकांच्या अन्न, वस्त्र व निवारा या तीन प्राथमिक गरजा त्यापैकी वीस कुटुंबाना निवारा उपलब्ध झाला.[१९]

पडकई पध्दतीसाठी साहाय्य :

डिंभे धरणाच्या परिसरात एकूण ३८ खेडी आहेत. या खेड्यातील लोक एकमेकांच्या शेतीमधील कामात मदत करण्यासाठी जातात. त्यावेळी कोणत्याही प्रकारचा मोबदला घेतला जात नाही. या पध्दतीला आदिवासी समाजात 'पडकई' हा पारंपारीक शब्द आहे. ज्या पध्दतीची पुढारलेल्या समाजात प्रकर्षाने आवश्यकता आहे. कारण तो एक सामाजिक ऐक्याचा भाग आहे. पडकई पध्दतीच्या माध्यमातून आदिवासी समाजातील लोक डोंगर माथ्यावर व उतारावर शेतीचे छोटे छोटे भाग तयार करतात. कारण या भागात लागवडीयोग्य जमीनीचे प्रमाण खूप कमी आहे. कृषी विभागाने सुरू केलेल्या डोंगरी विभागातील शेतकरी लोकांना डोंगर माथा व उतारावरील शेतजमीन करण्यासाठी साहाय्य करण्याचा एक कार्यक्रम हाती घेतला होता. त्यासाठी शाश्वत संस्था व आदिवासी समाजाने प्रस्ताव पाठविला. महाराष्ट्र राज्य सरकारने एकूण खर्चाच्या तिसरा हिस्सा देणे मान्य केले. त्यामुळे लोकांना आर्थिक साहाय्य उपलब्ध झाले. त्यानंतर राज्य सरकार, स्थानिक नेते, आदिवासी एकजूट संघटना यांच्य प्रयत्नाने व शाश्वत संस्थेच्या व्यवस्थापनाने ५ वर्षासाठी ४२ कोटी रूपये महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून दगडी बांध घालण्यासाठी मंजूर झाले. पडकई पध्दतीतून सहा हजार शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यास मदत झाली. ही महाराष्ट्रात पहिल्यांदाच राबविली गेलेली योजना होती. जानेवारी २०११ पासून ५ खेड्यांच्या विकासासाठी २ कोटी रूपये मंजूर झाले.[२०]

जमीनी मालकी संदर्भात खाती फोड करून देण्याचा कार्यक्रम शाश्वतने हाती घेतला. ३९ खेड्यांमध्ये तो कार्यक्रम राबविला. तहसील कार्यालयाच्य मदतीने हा प्रकल्प पूर्ण झाला. या प्रकल्पाचे वैशिष्ट्ये म्हणजे ६०७ महिलांना जमीन मालकीत हक्क मिळाला. स्त्री – पुरूष हक्काचं हे महत्त्वपूर्ण उदा. आहे. नोव्हेंबर २०१२ मध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत ४२ खेड्यातील १,७५५ शेतकऱ्यांसाठी ३२८ लाख रूपये सरकारकडून उपलब्ध करून दिले गेले. त्यातून १५१ हेक्टर क्षेत्रात भात लागवडीसाठी जमीन तयार करावयाची होती. धरणाच्या निर्मितीमुळे विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांनी २०१३ मध्ये ८०० क्विंटल बाजरीचे उत्पादन घेतले. परिणामी दरवर्षी स्थलांतर करणाऱ्या १४ खेड्यातील लोकांचे स्थलांतर यावर्षी थांबले.

या कार्याबरोबरच ज्यांची डिंभे धरणात अंशत: जमिन आहे अशा विस्थापित कुटुंबाची संख्या २०० आहे. त्यापैकी ४२ कुटुंबाच्या कागदपत्रांची पूर्तता करून स्त्रीयांसाठी रोजगार निर्मिती व्हावी म्हणून संघटना



Scanned with OKEN Scanner

स्थापन केली. आज या संस्थेमार्फत आदिवासी स्त्रीयांचे स्वतःला मदत करणारे ४० महिला बचत गट कार्यरत आहेत. हे बचत गट सदस्य महिलांना लोन देऊन पीठाची गिरणी, तांदुळ गिरणी, मत्स्य व्यवसाय इ. मदत करतात. महिलांना स्वावलंबी बनण्यास प्रवृत्त करणारा हा स्तुत्य उपक्रम आहे.[२१]

**स्त्रीयांसाठी आरोग्य सुधारणा कार्यक्रम:**

आदिवासी समाजात आरोग्याविषयी जागृती झालेली नव्हती. पुरूष, स्त्रीया आणि मुले या सर्वांनाच आजारी पडल्यानंतर उपचार करण्यासाठी वनौषधींचा वापर केला जात होता. स्त्रीया व कुपोषित मुले आजाराला बळी पडत. २०११ मध्ये शाश्वत संस्थेच्या नऊ स्त्रीयांनी मंचर येथील आरोग्य विभागाच्या डॉक्टरांकडून प्रशिक्षण घेतले. त्यांनी डिंभे परिसरातील तीन प्राथमिक आरोग्य केंद्र व १२ उपकेंद्रांना भेटी दिल्या अणि वाय.सी.एम. पिंपरी चिंचवड येथे उपलब्ध असणाऱ्या सुविधांची माहिती दिली. तसेच मुलांच्या कुपोषण तपासणीसाठी चार खेड्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, डिंभे येथे येण्यासाठी मार्गदर्शन केले. तळेघर व अडिवरे येथील १५० बालकांना लस टोचण्यात आली. शाश्वतच्या आरोग्यसेविका शासकीय आरोग्य विभागामार्फत घेतल्या जाणाऱ्या बैठका व प्रशिक्षण शिबीरासाठी उपस्थित असतात. आज या आरोग्य सेविका एकूण वीस खेड्यात कार्यरत आहेत. २०१३ मध्ये त्यांनी खालील उपक्रमांचे आयोजन केलेले होते.

१) कातकरी व महादेव कोळी समाजातील महिलांसाठी हिमोग्लोबीन तपासणी कॅम्पचे आयोजन केले होते.
२) कुपोषण व लसीकरण या संबंधीत स्त्रीयांसाठी विशेष शिबीराचे आयोजन केले होते.
३) सकाळ सोशियल फाऊंडेशनतर्फे डोळे तपासणी कॅम्प आघाणे येथील शाळेत घेतला.
४) मुलांसाठी दात व आरोग्य तपासणी कॅम्पचे मंचर येथील डॉ. दिपाली मांढरे व डॉ. शिवमाला धायबर यांच्या माध्यमातून आयोजन केले.[२२]

**समाज उत्सव :**

आदिवासी समाजात पारंपारिक पध्दतीने सण उत्सव साजरे केले जातात. त्यामध्ये सर्व आदिवासी बांधव सहभागी होतात. समाज ऐक्य व समाज विकासाचे हे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. मात्र आधुनिक काळात त्यामध्ये बदल होत आहेत. त्यानुसार समाजसुधारणेत महिलांचा सहभाग वाढावा, त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून शाश्वतने महिलांसाठी १९ मार्च २०१३ मध्ये 'स्पोर्टस् डे' चं भोईरवाडी येथे आयोजन केले होते. या कार्यक्रमात वीस खेड्यातील महिला सहभागी झाल्या होत्या. याचाच अर्थ महिलांमध्ये जागृती होत आहे.

आदिवासी समाजाच्या साहित्य व वाङ:मयाविषयी डिंभे येथे ४ व ५ मे २०१३ ला कार्यक्रम आयोजित केला हेता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नागनाथ कोतापल्ले, मा. अध्यक्ष मराठी साहित्य संमेलन यांनी भूषविले होते. तर प्रमुख पाहुणे प्रसिध्द आदिवासी कवी वाहरू सोनवणे हे होते. आदिवासी कवी व लेखकांनी आपल्या साहित्याचं सादरीकरण केले. यावेळी कुसूमताई कर्णिक यांना 'आदिवासी सेवक' पुरस्कार प्रदान करण्यात आला.[२३]

**देणगीदार :**

कोणतेही सामाजिक कार्य करण्यासाठी आर्थिक व इतर मदतीची गरज असते. ती गरज समाजातील सामाजिक बांधिलकी जोपासणारा घटक पूर्ण करत असतो. शाश्वत संस्थेच्या या कार्याला शासकीय, स्थानिक, देश, विदेश पातळीवरून वैयक्तिक व वेगवेगळ्या फाऊंडेशनतर्फे मदत मिळते. त्यामध्ये Barnas Vennar (Norway)] Tech Mahindra Foundation] Thermax Social Intiative Foundation, Inner Wheel Club of Manchar, Trans Tech Turnkey, Pune, Caring Friends, Mr. Ramesh Kacholia & Narayani Gulab Foundation Mumbai, Focus India Forum Singapore, Mr. J.S.Chddha Mumbai, Village Development Council London, Workers of Merecedes Benz, India, Pune, Central Institute of Fishieries Education (CIEF) Mumbai, and the Revenue, Agriculture, Fisheries and Tribal Development Departments of Maharashtra Government.



Scanned with OKEN Scanner

वरील संस्था व व्यक्तींच्या साहाय्यामुळेच शाश्वत संस्थेच्या कार्याला गती मिळाली असे कुसूमताई कर्णिक सांगतात.[२४]

**पुरस्कार व बक्षीसे :**

शाश्वतने केलेल्या कार्यामुळेच संस्थेला आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवरचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. २०१२ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटना विकास कार्यक्रमाद्वारे दिल जाणार पहिल बक्षीस शाश्वत संस्थेला मिळालं. शाश्वत संस्थेच्या शाश्वत विकासाचा हा बहूमान होता. हा कार्यक्रम 'त्पव कम श्रंदमपतव' येथे २० जून २०१२ रोजी पार पडला. त्यानंतर महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पुरस्काराचे कौतुक करण्यासाठी व संस्थेचा सन्मान करता यावा यासाठी मे २०१३ मध्ये पुन्हा या पुरस्काराचं सरकरतर्फे वितरण करण्यात आले.[२५] कुसूमताई कर्णिक यांना त्यांच्या सेवेबद्दल 'आदिवासी सेवक' पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच 'लोकमत वुमेन समिती २०१४' या कार्यक्रमात कुसूमताई कर्णिक यांना लोकमत सखी मंचतर्फे 'मातोश्री वीणादेवी दर्डा' पुरस्कार देण्यात आला.[२६]

१) मुलाखत, कुसूमताई कर्णिक, संस्थापक शाश्वत संस्था मंचर, दिनांक २२/०५/२०१५.
२) मुलाखत,आनंद कपूर, संस्थापक शाश्वत संस्था मंचर, दिनांक ०४/०५/२०१४.
३) गोविंद गारे, 'सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी', आदिम साहित्य, पुणे, तृ. आ. २००७, पृ. ३०९.
४) मुलाखत,कुसूमताई कर्णिक, संस्थापक शाश्वत संस्था मंचर, दिनांक २२/०५/२०१५.
५) नरके हरि (संपा.) 'महात्मा फुले गौरव ग्रंथ' के जोशी एस.एम.समग्र क्रांतीचा उदगाता महात्मा फुले, प्रकाशक महाराष्ट्र शासन समिती, २००६, पृ. ४९.
६) गोविंद गारे, 'सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी', आदिम साहित्य, पुणे, तृ. आ. २००७, पृ. ३५१ — ३५६.
७) कित्ता, पृ. ३५९.
८) Commissioner, Tribal Development Dept. Maharashtra State, Nasik, 2000 – 2001.
९) KAAY MAHNTOS, What's New , News From Shashwat Trust – Nov- 2013.
१०) KAAY MAHNTOS! , News From Shashwat Trust – August 2012.
११) KAAY MANNTOS! , News From Shashwat Trust – May- 2011.
१२) KAAY MAHNTOS, What's New, News From Shashwat Trust – Nov- 2013.
१३) गोविंद गारे, 'सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी', आदिम साहित्य, पुणे, तृ. आ. २००७, पृ. २९२,२९३.
१४) KAAY MANNTOS! , News From Shashwat Trust – May- 2011.
१५) मुलाखत,कुसूमताई कर्णिक, संस्थापक शाश्वत संस्था मंचर, दिनांक २२/०५/२०१५.
१६) मुलाखत,आनंद कपूर, संस्थापक शाश्वत संस्था मंचर,दिनांक ०४/०५/२०१४.
१७) KAAY MANNTOS! , News From Shashwat Trust – May- 2011.
१८) KAAY MAHNTOS, What's New , News From Shashwat Trust – Nov- 2013.
१९) KAAY MANNTOS! , News From Shashwat Trust – May- 2011.
२०) KAAY MAHNTOS, What's New , News From Shashwat Trust – Nov- 2013.
२१) KAAY MAHNTOS, What's New , News From Shashwat Trust – Nov- 2013.
२२) मुलाखत, बबन आबा मावळे, उपसरपंच पाटण,दिनांक २२/०५/२०१५.
२३) KAAY MAHNTOS, What's New , News From Shashwat Trust – Nov- 2013.
२४) मुलाखत,कुसूमताई कर्णिक, संस्थापक शाश्वत संस्था मंचर, दिनांक २२/०५/२०१५.
२५) मुलाखत, प्रतिभा तांबे, सदस्या शाश्वत संस्था, मंचर.दि. २२/०५/२०१५.
२६) दैनिक लोकमत, हॅलो पुणे, शुक्रवार दि. ५ डिसेंबर २०१४. पृ. ४.



Scanned with OKEN Scanner